## नि.क्र.५ वरील आदेश

१. अर्जदार/वादी यांनी दावा घोषणेकरीता व कायमचे मनाई हुकुमाकरीता दावा दाखल केलेला आहे. अर्जदार यांची थोडक्यात बाजू अशी आहे की, प्रतिवादी क्र.१ कमलबाई व मय्यत शांताबाई सूनेचा तो भाउ आहे, तसेच ते सर्व मंगल मानाजी इंगोले व रंगूबाई इंगोले यांचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.१ व ५ यांची प्रतिवादी क्र.६ ला वाद मालमत्ता विकण्याचा करार खोटया कागदपत्रांचे आधारे केलेला आहे. परंतू, वाद मालमत्ता त्याचे ताब्यात आहे. त्यामूळे वादी याने सदरचा दावा दाखल केलेला आहे.

२. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी हजर झाले त्यांनी नि.क्र.१३ वर आपले लेखी जबाब दाखल केले. त्यांनी वादीची संपूर्ण बाजू नाकारलेली आहे. त्यांच्या अतिरीक्त जबाबामध्ये त्याने असे म्हटले आहे की, रंगूबाई इंगोले यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यात दि.२४.८.१८८३ ला पंचांसमक्ष केळझर येथे वाटणीपत्र करण्यात आले होते व त्यामध्ये वादीला फक्त २४.२५ मिटर उत्तर-दक्षिण व ४ मिटर पुर्व-पश्चिम म्हणजेच ९७ चौरस मिटर जागा वाद मालमत्तेच्या पश्चिम बाजूला मिळाली होती व उर्वरित मालमत्तेमध्ये मय्यत रंगुबाई व मंगल इंगोले यांचे वारसांच्या हिस्स्यामध्ये आली होती. वादी याने आवश्यक माहिती लपविल्यामूळे वादीचा दावा खारीज करण्यात यावा.

३. वादी/अर्जदार यांनी नि.क्र.४ व १७ च्या यादीप्रमाणे आवश्यक कागदपत्रे दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी यांनी नि.क्र.१९ चे यादीप्रमाणे आपसी वाटणीपत्र दाखल केले आहे. वादी/अर्जदार यांच्यातर्फे श्री.ॲड.पेटकर व प्रतिवादीतर्फे श्री.ॲड.चौबे यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला व खालील मुददयांचे सकारण जबाब मी नोंदवित आहे.

| मुददे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अर्जदार हे सिद्ध करतो काय की प्रथमदृष्टया प्रकरण त्याचे बाजुने आहे? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार हे सिद्ध करतो काय की न्यायचा समतोल त्याचे बाजुने आहे? | नकारार्थी |
| ३. | अर्जदार हे सिद्ध करतो काय की जर त्याला तात्पुर्ता मनाई हुकुम मिळाला नाही तर कधीही भरून न होणारे नुकसान होईल? | नकारार्थी |
| ४. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>मुददा कं.१ चे उत्तर</u>:**

४. वादी/अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, मंगल इंगोले व रंगुबाई इंगोले यांनी वादी यांना नोंदणीकृत दत्तक पत्रान्वये दत्तक घेतले आहे व दत्तकपत्र दुय्यम निबंधक कार्यालय वर्धा येथे नोंदणी करण्यात आले आहे. मय्यत शांताबाई हिचे लग्न १९५६ साली गुलाबराव सुनेसोबत व कमलबाई हिचे लग्न १९५८ साली मोतीराम गुजरसोबत संपन्न झाले होते. मंगल इंगोले व रंगूबाई यांना वरील दोन मुली होत्या. त्यांना मुलगा नसल्यामूळे त्यांनी वादी यांना तो एक वर्षाचा असतांनी दत्तक घेतले होते. त्यामूळे वादी वाद मालमत्तेचा एकमेव वारस झालेला आहे. मंगल इंगोले हे १९६१ साली मरण पावले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी नामे रंगूबाई इंगोले ही वाद मालमत्ता पाहत होती. वाद मालमत्ताचे प्लॉट कमांक ४११ असून ती ५५६७.२२ चौरस मिटरची असून ती वार्ड कमांक ३ मौजा केळझर येथे आहे. मंगल इंगोले यांच्या मृत्युनंतर सदर मालमत्तेवर त्यांची पत्नी रंगूबाई इंगोले व ईतर वारसांचे नाव चढविण्यात आले. वादी रंगूबाई इंगोले हिची काळजी घेत होता. रंगूबाई इंगोले ही १९८३ साली केळझर येथे मरण पावली. वादी याने वाद मालमत्तेमध्ये स्वत :च्या नावाची नोंद केली नाही. २००२ साली वादी याने वाद मालमत्तेमध्ये २८०० चौरस मिटरमध्ये घर बांधले व ईतर जागा मोकळी ठेवली.

५. प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.६ च्या मदतीने खोटे कागदपत्र तयार केले व खोटे कागदपत्रांच्या आधारे प्रतिवादी क्र.१ ने मय्यत मंगल इंगोले

व रंगूबाई इंगोलेची ती एकमेव वारस आहे असे शपथेवर कळवीले व त्यांना ईतर कोणतेही वारस नाही असे म्हणून तिने वाद मालमत्ताचा फेरफार स्वत:च्या नावे करुन घेतला. प्रतिवादी क्र.१ हिने त्याआधारे प्रतिवादी क्र.५ यांना वाद मालमत्ता विकण्याचा करार केलेला आहे. वादी याने अभिलेखावर कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यामध्ये त्यांनी दत्तकपत्र तसेच प्रतिवादी क्र.१ ने तयार केलेले खोटे कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. प्रतिवादी लोकांनी त्यांच्या अतिरीक्त जबाबामध्ये वादीच्या दत्तकपत्राची बाब नाकारलेली नाही. यावरुन वादी हा प्रतिवादी क्र.१ व मयत शांताबाई सुने यांचा दत्तक भाउ आहे ही बाब सिध्द होते. प्रतिवादींनी अभिलेखावर घराचे वाटणीपत्र दाखल केलेले आहे असे दिसून येते. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वाटणीपत्र दि.१९.३.१९८३ ला करण्यात आलेले आहे, त्यामध्ये मौजा केळझर येथे मंगल मनाजी इंगोले व रंगूबाई मंगलजी इंगोले यांच्या घराची वाटणी केलेली आहे असे दिसून येते. त्यामध्ये वादी रामचंद्र इंगोले, संमतीबाई चंद्रकांत तोटे, दिपाताई मधुकरराव कसबे, शकुंतलाबाई भगवानजी राउत, कमलबाई रामकृष्ण निचत, शांताबाई गुलाबराव सुने, कमलाबाई मोतीरामजी इंगोले तसेच मय्यत रंगूबाई मंगलजी इंगोले यांचे घर कमलबाई मोतीराम गुजर हिच्या हिस्स्यात देण्यात आले आहे.

६. वादी यांनी प्रतिवादी यांच्यासोबत असलेले नातेसंबंध स्वीकारलेले आहे. तसेच प्रतिवादी मय्यत शांताबाई व कमलबाई हे मय्यत मंगल मनाजी इंगोले व रंगूबाई मंगल इंगोले यांचे वारस आहे ही बाब सूध्दा त्यांनी कबूल केलेली आहे तसेच वाद मालमत्ता मंगल इंगोले यांच्या मालकीची होती ही बाब सूध्दा त्याने कबुल केलेले आहे. त्यामूळे वाद मालमत्तेचा तो एकमेव वारस आहे असे म्हणणे योग्य होणार नाही व वाटणीपत्रावरुन वाद मालमत्तेमध्ये त्यांच्यात वाटणी झालेली आहे ही बाब प्रतिवादी यांनी अभिलेखावर आणलेली आहे. अर्जदार याने प्रथमदृष्टया प्रकरण स्वत:च्या बाजूने आहे ही बाब सिध्द केलेली नाही. त्यामूळे मी मुददा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र.२ चे उत्तर</u>**:-

७. वादी याने वाद मालमत्तेचा तो एकमेव वारस आहे असे म्हटलेले आहे तसेच त्याने प्रतिवादी क्र.१ हिने वाद मालमत्ता खोटया कागदपत्राच्या आधारे विकण्याचा करारनामा प्रतिवादी क्र.६ सोबत केलेला आहे असे म्हटले आहे. परंतू अर्जदार यांनी अभिलेखावर कराराची प्रत दाखल केलेली नाही किंवा त्या अनूषंगाने संबंधीत लोकांचे शपथपत्र दाखल केले नाही. त्यामूळे वादी यांच्या बाजुला संयुक्तीक पुरावा मिळून आला नाही. अर्जदार याने मुददा क्र.१ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे प्रथमदृष्टया प्रकरण त्याच्या बाजूने आहे ही बाब सिध्द केलेली नाही, तसेच प्रतिवादींनी केलेला करारनामा अभिलेखावर दाखल केला नसल्यामूळे न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. वादी याने मुददा क्र.२ सिध्द न केल्यामूळे मी त्याचे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र.३ चे उत्तर</u>** :-

८. वादीच्या बाजुपेक्षा प्रतिवादी यांची बाजू जास्त व योग्य संयुक्तीक असल्याचे दिसून येते. वादी यांनी सदर बाब सिध्द केली नाही की, त्याला जर तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश मिळाला नाहीतर त्याचे कधी न भरुन निघणारे नुकसान होईल. अर्जदार वादी यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र.१ व ५ यांनी खोटे शपथपत्र तयार करुन प्रतिवादी क्र.१ ही वाद मालमत्तेची एकमेव वारस आहे असे दाखवलेले आहे व त्याआधारे त्यांनी वाद मालमत्ता विकण्याचा करार प्रतिवादी क्र.६ सोबत केलेला आहे. वादी याने त्यासंबंधी पोलीस स्टेशन सेलू येथे दिलेली फिर्यादची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ व ६ च्या विरुध्द त्याने फौजदारी कार्यवाही सुरु केलेली आहे असे दिसून येते. वादी यांनी त्याला जर तात्पुरता मनाई हुकुम मिळाले नाहीतर त्याचे कधीही न भरुन निघणारे नूकसान होईल ही बाब प्रथमदृष्टया सिध्द केली नाही. म्हणुन मी मुददा क्र.३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

९. वादी यांनी त्याच्या वाद पत्रामध्ये असे म्हटले आहे की, प्लॉट नंबर ४११ मध्ये एकूण ५५६७.२२ चौरस फुट जागा मंगल इंगोले यांची होती. त्यांच्या व रंगूबाई यांच्या मृत्यूनंतर त्याने वाद मालमत्तेचा फेरफार केला नाही. त्याने २००२ साली वाद मालमत्तेमध्ये २८०० चौरस फुटमध्ये घर बांधले व उर्वरित जागा खाली ठेवली. परंतू, वादी यांनी दाखल केलेले दस्तऐवज क्र.२ वर वादी यांच्या नावे मालमत्ता क्र.४७१ आहे असे दिसून येते व त्यांच्या नावे १८४१ चौरस फुट जागा आहे असे दिसून येते. वादी याने दाखल केलेला दस्तऐवज क्र.५ मधील रंगूबाई मंगल इंगोले हिच्या नावे मालमत्ता क्र.४७० मध्ये २२५० चौरस फुट जागा आहे असे दिसून येते. तसेच दस्तऐवज क्र.१ मध्ये प्लॉट क्र.४११ मध्ये रंगूबाई इंगोले हिला मुळ धारक दाखविलेले आहे, त्यामध्ये ५१७.४० चौरस फुट जागा नमूद आहे व त्याचे फेरफार कमल मोतीराम गुजर हिच्या नावाने झालेल आहे असे दिसून येते. वादी याने दाखल केलेले दस्त क्र.४ मध्ये मालमत्ता क्र.४७१ वादी यांच्या नावे व दस्त क्र.५ मध्ये मालमत्ता क्र.४७० रंगूबाई मंगल इंगोले हिच्या नावे आहे असे दिसून येते. वाटणीपत्राप्रमाणे कलम गुजर हिला रंगुबाई इंगोले हिच्या नावावरची जागा देण्यात आली आहे असे दिसून येते.

१०. वादी/अर्जदार यांनी पोलीस स्टेशन सेलू येथे फिर्याद दिली, त्यामध्ये त्याने प्लॉट नंबर १४१ चा खोटा फेरफार प्रतिवादी कमल गुजर हिने घेतला असे नमूद करण्यात आले आहे. वादी/अर्जदार यांनी वादपत्रामध्ये नमूद प्लॉट नंबर व फिर्यादमध्ये नमूद प्लॉट नंबरमध्ये तफावत दिसून येते. अर्जदार याने वाद जागा वाटणीपत्राप्रमाणे कोणा-कोणाच्या ताब्यामध्ये आहे याबाबतचा स्पष्ट खुलासा केलेला नाही.

११. सदर प्रकरणामध्ये वाद मालमत्तेचा मालक वादी एकटा आहे किवा वादी प्रतिवादी यांच्यात आपसी वाटणीपत्र झाले होते ही बाब पुराव्याअंती सिध्द होणार आहे. अभिलेखावर दाखल कागदपत्रावरुन मी निष्कर्षावर पोहोचलो की, वाद मालमत्तेचे मयत मंगल इंगोले व रंगूबाई इंगोले यांच्यात वारसानमध्ये

वाटणीपत्र तयार करण्यात आलेले आहे. त्यामूळे वादी वाद मालमत्तेचा एकटा मालक नाही. त्यामूळे वादी/अर्जदार तात्पुरत्या अर्जाची दाद मिळण्यास पात्र नाही. करिता मी  करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदार यांचा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज खारीज करण्यात येतो.

(एम.एम.गुप्ता)
दि.३०.०८.२०१८ दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सेलु.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

Name of Stenographer: J.K.Mudliyar
Court : C.J.J.D. Seloo
Order signed by the
Presiding Officer on : 30.08.2018
Order uploaded on : 30.08.2018